# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 12 October 2024

## Time 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १२ ऑक्टोबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी देशवासीयांना विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. दुर्गा माता आणि प्रभू श्री राम यांच्या आशीर्वादाने लोक जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात विजय मिळवतील, अशी भावना पंतप्रधानांनी समाजमाध्यमावर व्यक्त केली तर हा सण वाईटावर चांगल्याच्या विजयाचा संदेश देतो, सर्व दुष्कृत्यांचा नाश करण्याची प्रतिज्ञा सर्वांनी घेण्याचं आवाहन उपराष्ट्रपतींनी केलं आहे.

****

नागपुरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी सोहळा सरसंघचालक डॉक्टर मोहन भागवत यांच्या उपस्थितीत आज साजरा झाला. भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्त्रोचे माजी अध्यक्ष डॉक्टर के. राधाकृष्णन या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तंत्रज्ञानाने शैक्षणिक संस्थांमध्ये बदल घडवून आणला असून नवं राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०, भारताला एका समृद्ध अशा ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेमध्ये रूपांतरित करेल, असा विश्वास डॉ. राधाकृष्णन यांनी यावेळी व्यक्त केला. तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्ष लवकरच पूर्ण होत असून भारतीय धर्म आणि संस्कृतीचं रक्षण राष्ट्रीय स्वयंसेवक करत असल्याचं सरसंघचालक भागवत यावेळी म्हणाले. या सोहळ्यापूर्वी आज सकाळी स्वयंसेवकांचं पथसंचलन झालं, नागरिकांनी या संचलनाचं स्वागत केलं.

****

नवीन आणि नवीकरणीय उर्जा मंत्रालयानं प्रधानमंत्री सूर्य घर योजनेअंतर्गत अभिनव प्रकल्प लागू करण्यासाठीचे मार्गदर्शक तत्व जारी केले आहेत. या योजनेअंतर्गत, छतावर सौर पॅनल, व्यावसायिक प्रतिमान आणि एकीकृत तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्यासाठी ५०० कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या योजने अंतर्गत

छतांवरील सौर पॅनल, इलेक्ट्रीक वाहनं आणि बॅटरी स्टोअरेजला जोडणी करण्यासारख्या तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. राष्ट्रीय सौर उर्जा संस्था या अभिनव प्रकल्पासाठी कार्यान्वयन एजन्सीचं काम करणार आहे. निवडक प्रकल्पासाठी या योजनेअंतर्गत खर्चाच्या ६० टक्के किंवा ३० कोटी रुपयांपर्यंतची आर्थिक मदत देण्यात येणार आहे. केंद्रसरकारनं यावर्षाच्या फेब्रुवारी महिन्यात प्रधानमंत्री सूर्यघर– मोफत वीज योजनेला मंजुरी दिली आहे.

****

सर्वोत्तम तंत्रज्ञानानं सज्ज असलेल्या महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पामुळे डिजिटल माध्यमातून होणाऱ्या फसवणुकीचं प्रमाण तसंच जनतेमधली सायबर हल्ल्याची भीती कमी होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. महा सायबर–महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्पाचं उद्धघाटन काल मुंबईत, फडणवीस यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. सायबर गुन्ह्यांवरील त्वरीत कारवाईसाठीच्या एक चार चार शुन्य सात या दूरध्वनी मदत क्रमांकाचा प्रारंभ या कार्यक्रमात करण्यात आला. तंत्रज्ञान नेहमी बदलत राहतं, त्यामुळे तंत्रज्ञानातली प्रणाली हाताळणारे लोकही गतीमान असायला हवेत असं सांगून, या केंद्रात दरवर्षी पाच हजार पोलिसांना प्रशिक्षित करण्याची व्यवस्था आहे, अशी माहिती फडणवीस यांनी दिली. कार्यक्रमाला राज्याचे पोलिस महासंचालक, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव, वरिष्ठ पोलिस अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

****

चित्रपट आणि मनोरंजन क्षेत्रातल्या बदलत्या पद्धतींच्या अनुषंगानं चित्रपट धोरण समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी काल दिली. यामुळे राज्यातल्या चित्रपटसृष्टीला नवी दिशा मिळेल असं सांगून चित्रपट निर्मिती केंद्रांना प्रोत्साहन देणे, तांत्रिक आणि कौशल्य विकासाच्या क्षेत्रात नवनवीन संधी उपलब्ध करणे यासाठी समितीमार्फत धोरण आखण्यात येणार असल्याचं मुनगंटीवार म्हणाले.

****

मुख्यमंत्री तीर्थक्षेत्र योजनेअंतर्गत अयोध्या धामसाठी आज १२ तारखेला नांदेड इथून ज्येष्ठ नागरिकांना घेऊन निघणारी रेल्वे आजऐवजी येत्या २३ तारखेला नांदेड इथून निघणार आहे. या योजनेसाठी निवड झालेल्या पात्र लाभार्थी नागरिकांनी या सुधारित वेळापत्रकाची नोंद घ्यावी, असं आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केलं आहे.

****

गेल्या ऑगस्ट महिन्याच्या आरोग्य विभागांच्या क्रमवारीत वाशिम जिल्ह्याच्या आरोग्य विभागानं सर्व मानकांमध्ये राज्यभरातून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर याच क्रमवारीत बीड जिल्ह्यानं तिसरा आणि धाराशिव जिल्ह्यानं राज्यभरातून चौथा क्रमांक पटकावला आहे. तर जिल्हा आरोग्य शल्य चिकित्सक या क्रमवारीत हिंगोली जिल्ह्यानं दुसरा क्रमांक पटकावला आहे.

****

राज्यात आज सर्वत्र पावसाची शक्यता आहे. कोकण किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहण्याचा अंदाज असून चारही विभागात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

****